


# पैठणी

## महाराष्ट्राचं महावस्त्र

महाराष्ट्र शासन

# पैठणी

महाराष्ट्राचं महावस्त्र

MSSIDC
Maharashtra Small Scale Industries
Development Corporation Ltd.

महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामंडळ

# पैठणी

संकल्पना व संपादन : **लीना बनसोड**
*(सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ)*

सहकार्य :
**अलका मांजरेकर** *(व्यवस्थापक, त्रिमूर्ती पैठणी हस्तकला दालन, पैठण)*

**कृपया येथील नावे द्यावीत.**

विशेष आभार :

**श्री. शेखर पाटील** *(नगराध्यक्ष, पैठण. यांनी त्यांच्या घराण्यातील सुमारे शंभर वर्षांपूर्वीच्या पैठणी छायाचित्रासाठी उपलब्ध करून दिल्या)*

**श्री. पुष्कर गोसावी** *(श्री संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज. यांनी त्यांच्या घराण्यातील सुमारे दीडशे वर्षांपूर्वीची पैठणी छायाचित्रासाठी उपलब्ध करून दिली)*

**श्री. नरेंद्र मारवाडे** *(पैठणीचे परंपरागत विणकर. यांनी पैठणीविषयीचा अधिकृत मजकूर उपलब्ध करून दिला)*

**कवयित्री शांता शेळके** *('पैठणी' नेसणारी आजी आणि तिच्या नातीचे हृद्य नाते शब्दात विणलेली एक अप्रतिम कविता या पुस्तकात अंतर्भूत करण्यात आली आहे)*

फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी
**दिलीप कवळी, अक्षय वाव्हिया, सारंग असोलकर**

फोटो एडिटिंग, मांडणी, क्युआर कोड्स प्रोसेसिंग व मुद्रण :
**मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि.**











# अनुक्रमणिका


**पैठणीची ऐतिहासिक परंपरा** ........ २०

पैठण येथील महावस्त्र कलाकार ........ २७

पैठणमध्ये हस्तजराची निर्मिती ........ २७

पैठणीचे रंग ........ २८

'पैठणी'वरील जुनी व नवी चित्रकृती ........ ३१

पैठणीची रंगसंगती ........ ३१

चिरयौवना ........ ३६

पैठणीवरील प्राचीन नक्षी ........ ३९

अस्सल पैठणी कशी ओळखावी ........ ४६

पैठणीची काळजी ........ ४६

**पैठणीतील काव्य व काव्यातील पैठणी** ........ ५०

**मऱ्हाटी पैठणी प्रशिक्षण व उत्पादन केंद्र, पैठण** ........ ६०

**पैठणी विणकाम प्रक्रिया** ........ ६४

**माझे-पैठणीचे रेशमी नाते...** ........ ६८

मदनलाल प्रभाकर ढालकरी, अरुण भोसले, कविता अरुण ढवळे,

मंगल शिवाजी पवार, प्रिया श्रीराम भोळे, मथुरा रमेश लंगोटे,

स्वाती राहुल वेलंकीवार, जितेंद्र सुरेश कुलकर्णी, सुनिता कुलकर्णी,

अनिता संतोष धोकटे, काशिबाई अरुण पोटे, सुमित्रा भारत बडसर,

लक्ष्मीबाई प्रभाकर वाहोळे, अनिता शेळके

**पैठणी** *(कविता)* – शांता शेळके ........ ८४






# पैठणीची ऐतिहासिक परंपरा



वस्त्राचा शोध मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीतील एक महत्त्वाचा शोध आहे. सुती कापडाच्या शोधाने मानवी जीवनात खऱ्या अर्थाने क्रांती घडून आली. कापसाचे धागे टिकाऊ, सहज धुता येण्याजोगे आणि सुंदर वस्त्रनिर्मिती करायला अनुकूल असे होते. या धाग्यांच्या सौंदर्याने मनुष्याच्या सामाजिक जीवनाला एक नवी मिती मिळाली. भारतात हस्तकला आणि वस्त्रोद्योग यांचा नेहमीच जवळचा संबंध राहिलेला आहे.

भारतीय माणसाला विणकामाची कला किमान वीस हजार वर्षांपासून अवगत होती असे मत पुरातत्त्ववेत्ते डॉ. शंकर साळी यांनी मांडले आहे. यासाठी ते जळगावमधील पाटणे गावी उत्खननादरम्यान मिळालेल्या शहामृगाच्या अंड्याच्या कवचावरील जाळीदार नक्षीचा उल्लेख करत या जाळीदार नक्षीच्या निर्मितीच्या मुळाशी यापूर्वी कुठेतरी या आकृतीबंधाचे केलेले निरीक्षण आहे असे सांगतात. जाळीदार नक्षी म्हणजे आडवाण–उभारातून निर्माण झालेली चित्रकृती. ज्याअर्थी ही नक्षी कोरली आहे त्या अर्थी ती मानवाने त्याआधी कुठेतरी पाहिली असणार हा त्यांचा सिद्धांत.

वेद आणि उपनिषदे यांमध्येही रेशीम आणि लोकरीच्या विणकामाचा उल्लेख आहे. सूत कातणे आणि त्याचे वस्त्र विणणे ही वैदिक संस्कृतीची प्रमुख अंगे मानली जातात. वैदिक वाङ्मयातदेखील कशिदा केलेल्या कापडाचा संदर्भ आढळतो.

उदाहरणार्थ ऋग्वेदात सोनेरी विणकाम केलेल्या हिरण्य द्रापी या कापडाचा उल्लेख आलेला आहे. महाभारतात मणिचित्र म्हणजेच मोत्यांची झालर लावलेल्या रेशमी कापडाचा उल्लेख आढळतो. जैन ग्रंथांमध्ये भारतीय रेशीम म्हणजेच पट्टा यांचे वर्णन आले आहे आणि ग्रीकांनीही सुंदर अशा पैठणीचे गोडवे गायिले आहेत. हरप्पा संस्कृतीच्या काळात गुजरातमधील नागेश्वर येथे लोकरीचे उत्पादन होत असे. महाजनपदकाळात तसेच शिशुनाग आणि नंद यांच्या काळात विविध क्षेत्रांचा विकास झाला होता. जैनांची सूत्रे, बौद्धांची पीटके व ब्राह्मणसूत्र या साहित्यात कापूस, क्षौम, रेशीम व लोकर यापासून बनवलेल्या वस्त्रांचा उल्लेख येतो. त्याकाळच्या किनखांबी वस्त्रांना हिरण्यवस्त्र म्हटले जाई.

रेशमी धाग्यांची निर्मिती सर्वप्रथम चीनमध्ये करण्यात आली असा समज आहे. पण नवीन



▼ प्राचीन पैठणमध्ये जैन, बौद्ध, हिन्दू, महानुभाव, मुस्लीम अशा अनेक धर्म व पंथांच्या प्रसारकांनी आपले मुख्य केंद्र स्थापन केले होते. पैठण येथील श्री संत एकनाथ महाराज मंदिर




पुरातत्त्वविषयक सर्वेक्षणाने हा समज खोडून काढला आणि पैठणजवळच्या नेवासा येथे प्रागैतिहासिक आणि ऐतिहासिक काळाच्या दरम्यान फिक्या रेशमाची निर्मिती होत असल्याचे नमूद केले. काहीही असले तरी कापडाला भारतात दीर्घ इतिहास लाभला आहे.  भारतात ख्रिस्तपूर्व काळात वस्त्रांचा व्यापार तेजीत होता. या क्षेत्रात त्यावेळी भारत अत्युच्च स्थानी होता याचे कारण म्हणजे भारतीय कारागिरांनी वस्त्रकलेत मिळवलेले प्रावीण्य. त्यांनी केवळ विणण्याच्या कलेतच प्राविण्य मिळवले नव्हते तर हातमाग आणि यंत्रमागावरील भरतकामातही त्यांचा हातखंडा होता. या काळात भारतातील विणकर या कामात इतके कुशल होते, की येथील तलम कापड घेण्यासाठी परदेशी लोक तलम वस्त्रांच्या भारंभार सोने द्यायला तयार असत. या तलम वस्त्राला आब्रावान म्हणजे विणलेली हवा, शबनम म्हणजे दवबिंदू ही नावे होती. वेलबुट्ट्यांचे विणकाम व विविधरंगी वस्त्र हे येथील वस्त्रांचे वैशिष्ट्य होते. इतर अनेक कलांप्रमाणेच वस्त्रे विणणे आणि संबंधित इतर कला पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या होत्या. त्यामुळे ती कला त्या कारागिराच्या घरातच रहात असे. हे कारागीर सहकारी तत्त्वावर काम करत. उद्योगाची मालकीही वंशपरंपरागत असे.

इ. स. पूर्व ३०० मध्ये दख्खनचे राज्य सातवाहन राजांच्या ताब्यात गेले. या काळात अनेक शहरी केंद्रे उदयास आली. भोकरदन (भोगवर्धन), तेर (तगारा), नासिक (गोवर्धन), ब्रह्मपुरी (कोल्हापूर) ही केंद्रे याच काळातील. या राजांची राजधानी म्हणजे पैठण आणि संपूर्ण सातवाहन काळात ही राजधानी पैठणच राहिली. जसजशी शहरे विकसित झाली तसतशी आर्थिक भरभराट झाली. सातवाहनांनी व्यापाराला उत्तेजन दिले. त्यामुळे रोम वगैरे शहरांशी समुद्रमार्गे व्यापार सुरू झाला. सुती वस्त्रे, रंगीत आणि साधे तलम कापड, मलमल, रेशीम, रेशमी धागे हा सगळ्यात जास्त मागणी असलेला माल होता. त्या काळात रेशमी पट्टांशुक, सोनेरी कलाबतूचे हिरिवस्त्र, काशीचे काशाकांशु, अपरान्तकाचे अपरान्तक, पुष्पपट्टचे किनखांब आणि छटिसदृश फ्रुट्टकवस्त्र ही वस्त्रे प्रसिद्ध होती.

ज्या मराठवाड्यात पैठण वसलेले आहे तिथली माती काळी असून हवामान कापसाच्या वाढीसाठी पोषक आहे. सातवाहन काळाआधीसुद्धा पैठणमध्ये सुती वस्त्रे विणली जात. नवीन राज्यकर्त्यांनी सुती आणि रेशमी कापडांच्या विणकामाला प्रोत्साहन दिले व लवकरच पैठण सुती आणि रेशमी कापडांच्या व्यापारासाठी प्रसिद्ध झाले. प्रतिष्ठान (पैठण) हे भारतीय इतिहासात भरजरी वस्त्रनिर्मितीचे प्रमुख केंद्र म्हणून विशेष प्रसिद्ध होते. संस्कृत, प्राकृत, मराठी लोकवाङ्मयात पैठण व पैठणच्या कलात्मक वस्त्रांचा उल्लेख अनेक ठिकाणी आलेला दिसतो. या वस्त्रांच्या निर्मितीस अनेक राजघराण्यांनी राजाश्रय दिला होता. गुहा, देवळे आणि इतर पुरातत्त्वीय ठिकाणांहून मिळालेल्या माहितीनुसार तसेच नाशिकमधील शिलालेखांनुसार पैठण हे विणकामाचे केंद्र होते. ७ व्या शतकातील भारतीय वस्त्रांचे उल्लेख युआन च्वांग या चिनी प्रवाशाच्या प्रवासवर्णनात आढळतात. ९ व्या शतकातील सुलेमान या व्यापाऱ्याच्या मते, भारतातील वस्त्र इतके तलम नि सुंदर असे की त्याचा पिळा अंगठीतून सहज जाऊ शके.

▼ *पैठणपासून अगदी जवळ असलेल्या अजिंठा लेण्यांमध्ये भिंती आणि छतावर अतिशय कलात्मक व नाजूक नक्षी रंगवलेल्या आढळून येतात. त्यातील कमळवेल ही नक्षी आणि पैठणीच्या काठापदरावरील नक्षी या दोनमध्ये बरेच साधर्म्य आढळून येते. यावरून या विणकाम कलेची प्रगल्भताही दिसून येते.*












पैठण येथे नाथ षष्ठीनिमित्त भरणाऱ्या कलामहोत्सवास उसळलेली गर्दी. पार्श्वभूमीवर संथ वाहणारी गोदावरी नदी



◀ *पैठणी कारागीर महिला*

सातवाहनांच्या आगमनाआधी पैठण सुती कापडाच्या गिरण्यांसाठी प्रसिद्ध असले तरी खऱ्या अर्थाने व्यापाराची भरभराट दख्खनच्या राजांच्या काळात झाली. या काळात पैठण हे तेर, कोल्हापूर, नालासोपारा, कल्याण, भरुच, पाटलीपुत्र अशा इतर व्यापारी केंद्रांशी व शहरांशी रस्त्यांच्या मार्गाने जोडले गेले. या काळात तलम वस्त्रे बांबूच्या नळकांड्यात व्यवस्थित ठेवून आणि त्याची दोन्ही तोंडे मेणाने बंद करून परदेशी पाठवली जात.

सातवाहन काळात लिहिल्या गेलेल्या गाथा सप्तशतीसारख्या ग्रंथात विविध गाथांमध्ये विणकाम, रंगलेपन, शिवणकाम, भरतकाम यांच्याबद्दल तपशीलवार माहिती दिली आहे. त्या काळात रेशमी वस्त्रे बहुतेक करून श्रीमंत लोक वापरत असत. प्रत्येक हिंदू सणाला विशेषत: दसरा–दिवाळीला नवनवीन महावस्त्रांची मागणी असे. पंढरीच्या विठोबाचे महावस्त्र पैठणमधूनच विणून नेले जाई. अनिहिलपट्टणच्या सिद्धराजाने याच काळात पैठणवर स्वारी करून पैठणी विणणारे कारागीर पळवून नेले होते असे इतिहास सांगतो. त्या काळी स्त्रिया सकच्छा आणि विकच्छा अशा दोन प्रकारच्या साड्या वापरत. पैकी आठव्या शतकापर्यंत विकच्छा साडी वापरली जात होती हे अजिंठा येथील चित्रांवरून सहज लक्षात येते. त्यानंतर सकच्छा साडी लोकप्रिय झाली ती एकोणिसाव्या शतकापर्यंत तशीच आहे.

त्या काळात बरीचशी वस्त्रे मागावरून काढून थेट वापरत आणि त्यात शिलाईकामाचा समावेश नसे. सातवाहनाचा क्षात्रपांसारख्या इतर राज्यकर्त्यांशी संबंध आल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडून वस्त्रशैलीचे अनुकरण केले आणि या काळात ट्राउझर्स, हेड स्कार्फ, शॉर्ट्स, ट्युनिक्स अशा नवनवीन शैलींचा उगम झाला.

महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधरस्वामी पैठण येथे आले. ते तेथे चार वर्षे राहिले. त्यांचा शिष्य महाभट याने रचलेल्या ‘लीलाचरित्रा’तही पैठण त्याकाळी वस्त्रांच्या व्यापाराचे मोठे केंद्र होते असे स्पष्ट झाले आहे.

अंगी, टोपी, धोती ही सामान्य माणसांची वस्त्रे म्हणून प्रचलित



होती. स्त्रिया साडी, चोळी, लेहंगा वापरत असत.

इस्लाम धर्माच्या आगमनानंतर झालेला एक मोठा बदल म्हणजे तयार कपड्यांच्या उत्पादनात झालेली वाढ. मलमल, रेशमी जरीचे कापड, भित्तीचित्रे, वेलबुट्टीचे कापड यांचा व्यवसाय भरभराटीला आला.

मुसलमानी राजवटीऐवजी मराठ्यांची राजवट आल्यावर मराठ्यांनीही पैठणच्या हस्तकला, उद्योग आणि व्यापाराला आश्रय दिला. त्यांनी काही जुन्या वस्त्रनिर्मिती करणाऱ्या शहरांची पुनर्रचना केली गेली आणि फक्त त्या त्या केंद्रापुरती वस्त्रनिर्मिती केली जाईल अशी केंद्रे निर्माण केली जाऊ लागली. प्रत्येक ठिकाणाने स्वत:चे असे वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन केले आणि त्यासाठीच ती ठिकाणे प्रसिद्ध झाली. उदा. औरंगाबाद येथील हिमरू आणि मशरू शाली, दौलताबाद आणि तेरची मलमल, पैठण आणि येवल्याची पैठणी, शहागडची शहागडी साडी, अहमदनगरचे सुती कापड, नागपूरची रेशमी काठ असलेली धोती इत्यादी. पैठण सुरुवातीपासून रेशमाच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असले तरी तेथे इतरही वस्त्रोद्योग प्रसिद्ध होते. विणकाम, रंगलेपन आणि भरतकाम यांच्यात सुधारणा होत होत नवीन आकृतीबंध विकसित होत होते.

पारंपरिक तरीही फॅशनेबल अशी ही पैठणी सहसा उच्चवर्गातील स्त्रिया नेसतात. सोने आणि चांदी यांव्यतिरिक्त पैठणीला मोती आणि मौल्यवान रत्नांनीही सजविले जाते.

पेशव्यांच्या काळात उपलब्ध असलेल्या दस्तावेजांमधून पैठणी त्याकाळी मराठा साम्राज्यातही खूप लोकप्रिय होती असा उल्लेख आला आहे. तिला असलेल्या वाढत्या मागणीमुळे सामर्थ्यवान अशा मराठा राज्यकर्त्यांनी आपापल्या स्वत:च्या पुणे, नाशिक, इंदोर, नागपूर, बडोदा, मिरज, कोल्हापूर अशा राजधान्यांच्या ठिकाणी पैठणी विणण्याचे व्यवसाय सुरू केले. त्यामुळे काही कुशल पैठणी कारागिरांनी पैठणहून त्या ठिकाणी स्थलांतर केले. त्यामुळे पैठणीची निर्मिती याही ठिकाणी व्हायला लागली. पण पारंपरिक पैठणीच्या तुलनेत ही नकलून तयार झालेली पैठणी दर्जाने कमी होती.

संपूर्ण भारतभरात असलेल्या मागणीमुळे पैठणीने पेशव्यांचे लक्ष वेधून घेतले. पैठणला असलेले आर्थिक महत्त्व लक्षात घेता त्यांनी पैठणवरील पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला. पण पैठणीच्या उत्पादनावर त्यांचे थेट नियंत्रण नव्हते. विणकरांशी थेट संबंध प्रस्थापित करावेत असे त्यांना कधीच वाटले नाही, कारण ते त्यांना हव्या असलेल्या वस्तू सावकाराकडून विकत घेत असत. त्यामुळे सावकारांना पैठणीच्या व्यापारामधून घसघशीत नफा मिळत असे.

अंगभूत सौंदर्यामुळे पैठणी त्याकाळी श्रीमंती नजराणा म्हणूनही पेश केली जाई.

त्या काळातील चित्रांनीही पैठणीची जादू आणि त्यावरील नक्षी जास्त उठावदार केली.

त्या काळातल्या त्या सुंदरशा भित्तीचित्रांमधील नायिका रंगीत वस्त्र धारण केलेल्या दाखवल्या जात. या वस्त्राचे काठ आणि पदर आकर्षक असल्याने तिला काठापदराची साडी असे नाव पडले. मंदिरांमधील भित्तीचित्रांमध्ये पुराणातले आणि रामायण, महाभारतातले देखावे चितारलेले दिसतात.









**भावसार समाजानेच पैठणीच्या रेशमास नैसर्गिक रंग देण्याची किमया शोधून काढली. लाल, पिवळा, निळा हे तीन मुख्य रंग व पांढरा व काळा हे उपरंग वापरून विविध छटा प्राप्त केल्या, त्याही एकूण ५२!**



*शालीवाहन काळात बगळे, हंस यांची चित्रकृती, यादवकाळात सुवर्णकमळ तर मोगलकाळात फुले, पक्षी, झाडे यांच्या चित्रकृती पैठणीच्या काठापदरावर विणल्या जात असत*




त्यातील नायिकांनी परिधान केलेल्या पारंपरिक जरतारी वस्त्रांचे मूळ पैठणी हेच आहे. चित्रकथीने पुढे याच संकल्पनेचा विस्तार केला आहे. प्राचीन काळातील सीता, तारामती, दमयंती, अहिल्या, द्रौपदी उष्ण रंगातल्या जरतारी वस्त्रांमध्ये चितारल्या गेल्या आहेत.

पैठणीने पुरुषवर्गालाही भुरळ घातली होती. त्यामुळे पैठणीचेच छोटे स्वरूप पीतांबर या नावाने निर्माण केले गेले. पीतांबरालाच सोवळे किंवा मुकटा म्हणतात.

पैठणी विणणाऱ्या विणकरांना साळी म्हणतात. पैठण हे साळी लोकांचे मूळ स्थान समजले जाते. साळ्यांमध्ये मराठा साळी व पद्म साळी हे दोन वर्ग आहेत. प्राचीन काळी त्यांना समाजात मोठा मानसन्मान होता. त्या काळात माग हे त्यांच्या स्वत:च्या अखत्यारीत होते आणि आपल्या मनाप्रमाणे वस्त्र विणण्यास त्यांना मुभा होती. त्या काळात ते जास्त सुखी होते. इस्लाम धर्माच्या आगमनानंतर परिस्थिती बदलली. मुसलमानांनी नवी वस्त्रप्रावरणे आणली. शिलाईकामाचे महत्त्व वाढले. यामुळे विणकरांची अवस्था बिकट झाली. त्यांचा ग्राहकांशी असलेला थेट संबंध तुटला. त्यांच्या आणि ग्राहकांच्या मध्ये आता मध्यस्थ आला. या दलालांनी बाजारपेठेवर हुकुमत मिळवली. मोठ्या प्रमाणावर स्वत:चे उखळ पांढरे करून घेतले. विणकर मात्र कित्येक वर्षे लुबाडले जात राहिले. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत ही अवस्था कायम होती.

प्राचीन पैठणमध्ये जैन, बौद्ध, हिन्दू, महानुभाव, मुस्लीम अशा अनेक धर्म व पंथांच्या प्रसारकांनी आपले मुख्य केंद्र स्थापन केले होते. पैठणच्या परिसरातील लोकजीवनाचे आणि संस्कृतीचे वर्णन त्यांच्या वाङ्मयामधून अनेक ठिकाणी आलेले दिसते. त्यातील पैठणच्या भरजरी महावस्त्राचे उल्लेख तर अत्यंत महत्त्वाचे आहेत.

सातवाहनानंतर वाकाटक, राष्ट्रकूट राजवटींनी महाराष्ट्रावर राज्य केले. त्यांनीही पैठणच्या या भरजरी वस्त्र विणकामाच्या कौशल्यास उत्तेजन दिले व महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा सांभाळली. यानंतर देवगिरीचे यादवराजे सत्तेवर आले व त्यांनी पैठण आणि पैठणीचे वैभव वाढविण्यास सुरुवात केली. या काळात पैठणमध्ये पैठणीचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर होत होते. या काळात या महावस्त्रास ‘मालगंठी’ किंवा ‘पीतांबर’ म्हणत असत. प्रत्येक हिन्दू सणात नवनवीन प्रकारच्या पैठणीस विशेष मागणी असे. या महावस्त्राची लोकप्रियता केवळ देशातच नव्हे, तर परदेशातही होती हे त्या काळच्या व्यापाराचा अभ्यास केल्यास आढळून येते. बांबूच्या







निळा रंग तयार करण्यासाठी लाजवंती, नीळ (इंडिगो) वनस्पती इत्यादींपासून हा रंग तयार करतात. हा रंग चमकदार असतो. उत्तर हिंदुस्तानात निळ्या रंगाचे दुर्मीळ खडे मिळतात. त्यापासूनही हा रंग तयार करतात

सुळकांड्यांमध्ये ही वस्त्रे ठेवून त्यांची तोंडे बाजूने मेणाने बंद केलेली असत. याबाबत टॉलमी, इब्न बतूता यांचे उल्लेख खूप काही सांगून जातात. ग्रीक, रोमच्या वस्त्रालंकारावरही या जुन्या भरजरी वस्त्रावरील चित्रकृतींचे साम्य आढळून येते.

## पैठण येथील महावस्त्र कलाकार

पुरातन पैठण येथील महावस्त्र कारागिरांचा म्हणजे स्वकुळसाळी समाजाचा इतिहास खूप प्राचीन आहे.

प्राचीन पैठणचा विणकर हा महावस्त्र विणीत नसून जणू काव्यच गुंफतो आहे, असे भासत असे. विणकला हे त्याच्या दृष्टीने एक पवित्र कार्य होते.

पैठणीवरील संपूर्ण नक्षी तो हातांनी विणीत असे व आजही ती त्याच प्रकारे विणली जाते. या नक्षीचे वैशिष्ट्य म्हणजे ती दोन्ही बाजूंनी सारखीच दिसते. पैठणीस लागणारी जरदेखील त्या काळी पैठणमध्ये हातानेच तयार केली जात असे.

## पैठणमध्ये हस्तजराची निर्मिती

'जर' तयार करण्यासाठी सोनार जमातीचे लोक चांदीवर सोन्याचा पत्रा चढवून प्रथम लगडी तयार करीत असत. जितके मासे (वजन) सोने असेल त्याप्रमाणे त्या जरीस नाव देण्यात येत असे. उदा.

८ मासी, ६ मासी इ. तिच्या किंमतीही त्यावरूनच ठरविल्या जात. या लगडी नंतर चक्राच्या साह्याने छिद्रांच्या पटासीतून ओढून ओढून त्यांच्या बारीक तारा तयार करण्यात येत. नंतर या तारा मोठमोठ्या रिळांवर गुंडाळून चपडे समाजातील महावस्त्र कलाकारांकडे पाठविल्या जात.

चपडे लोक या तारांना ऐरणीवर छोट्याशा हातोड्याने सारख्या प्रमाणात ठोकून त्याचे पातळ बादले (पत्रा) तयार करीत. हे मोठे कौशल्याचे काम होते. हे पत्रे एका मिमीपेक्षा पातळ असत. या पातळ बादल्यांचाही प्रत्यक्षात आडवान म्हणून उपयोग करण्यात येत असे व शाही पोशाखांच्या वस्त्रावर या बादल्याच्या साह्याने रेशमाच्या उभारात सुंदर सुंदर चित्रकृती विणल्या जात. हे शाही पोशाख दिसायला खूपच सुंदर असत.

बादल्यांपासून जर तयार करण्यासाठी हे बादले पटवेकऱ्याकडे पाठविले जात. हे पटवेकरी रेशमाच्या धाग्यावर बादले गुंडाळण्यासाठी रेशीम एका चातीवर आणि बादले दुसऱ्या चातीवर गुंडाळून दोन्ही टोके एकत्र घेऊन ते मांडीवर किंवा पिंड्यावर ठेवून त्यांना वेगाने पीळ देत असत. बादल्याच्या आत रेशीम गुंडाळल्यामुळे रेशीम प्रत्यक्ष



पैठण शहरात पैठणीशिवाय इतरही विविध प्रकारच्या रेशमी वस्त्रांचे विणकाम होत असे. त्यात प्रामुख्याने पिंताबर-कद-मुकटे-सोवळे, बत्ती, शेला, दुपेटा, ओढणी (तुका), पट्टी, खणावळ यांचा समावेश होतो.



दृश्य रूपात दिसत नसे तर वरील 'जर' मात्र बादल्याच्या अंगभूत गुणामुळे आकर्षक दिसत असे.

अशा प्रकारे पैठणमध्ये मोठ्या प्रमाणावर जराची निर्मिती हातानेच करण्यात येत असे. या हस्तकारागिरीत पैठणचा बहुसंख्य समाज गुंतलेला असे.

## पैठणीचे रंग

कच्चे रेशीम पैठणमध्ये बाहेरून मागविण्यात येत असे. या कच्च्या रेशमाचा कडकपणा काढून त्यावर रंग पक्का बसवण्याचे काम भावसार समाजाचे लोक करीत.

या समाजानेच पैठणीच्या रेशमास नैसर्गिक रंग देण्याची किमया शोधून काढली. लाल, पिवळा, निळा हे तीन मुख्य रंग व पांढरा व काळा हे उपरंग वापरून विविध छटा प्राप्त केल्या.

पिवळा, नारंगी, केशरी, गर्द पिवळा, फिक्कट गुलाबी, फिक्कट हिरवा, ढगाळ पांढरा, गव्हाळ, निळा, पाण्यासारखा फिक्कट निळा, आकाशी, हिरवा, पोपटी, तांबडा, तपकिरी, किरमिजी, मोतिया, गरुड निळा, उडदानी, बैंगनी, बसंती, फिरोझी, काळसर, राखी, फिक्कट हिरवा, गर्द लाल, बदामी, धूपछांव, मोरपंखी, गुजरी, मिराणी, पसिला, गुंजी, कुसुंबी, जांभळा, पारवा, शेवाळी, तपकिरी, विटकरी, डाळींबी, चंदनी, काही, गर्दकाही, गुलेनार, सिंगरफी, फिकट पिवळा, गर्द गुलाबी, कथिया, गर्द हिरवा, क्षीरोदक, अंजिरी, मोरपंखी अशा या सुमारे ५२ रंगछटा होत.



या रंगछटा मिळविण्यासाठी प्रामुख्याने मंजिष्ठ, निवडुंगावरील फुले, फणस, हळद, टेसूचे फूल, तुती, बहेडा, काथ, गेरू, नासपती, पतंग, माजूफल, कुटकी, बाभळीची साल, डाळिंबाची साल, काजळी, सिंगरफ (धातू) लाख, पिवळी माती, लोह, हुरमुंजी, बाभळीच्या शेंगा, बोरीची साल, काकडा सिंगी, आवळा, लाजवदी, करडीची फुले, नीळ, केशराचे देठ, मेंदी, बिलो वनस्पती, हरसिंगार आणि इतरही विविध पाने, फुले यांचा उपयोग केला जाई.


रेशमास रंग दिल्यानंतर रंग पक्का बसावा म्हणून हरभऱ्याची आंब, मीठ, तुरटी इत्यादीचा वापर केला जाई. त्यानंतर रेशीम सावलीत सुकवावे लागे.

अशा प्रकारे पैठणमध्ये प्राचीन काळापासून सोनार, तार, चपडे, पटवेकरी, स्वकुळसाळी आणि पैठणी विणावयासाठी लागणारे मागाचे साहित्य तयार करणारे सुतार, फनाडी, राऊळ आणि शिकलकरी हे समाज महावस्त्र निर्मितीच्या कामामध्ये गुंतलेले असत. फनाडी समाजाचे कारागीर फण्या तयार करीत तर राऊळ समाजाचे लोक वयी तयार करीत असत. घोडे हे बैलाच्या शिंगापासून बनविले जाई. हा उद्योग शिकलकरी समाज करीत असे. प्रत्येक समाजातील कुटुंबच्या कुटुंब आपापल्या कामात व्यग्र असे.

मुख्यत: ब्राह्मण समाज या महावस्त्रांचा वापार करी. पूर्वी पैठणी चांदीच्या रुपयाच्या भारंभार विकली जात असे. नऊवार आणि ११ वारी पैठण्या विणल्या जात. ब्राह्मणांचे कद–मुकटे–पीतांबर–सोवळे, देवादिकांच्या मूर्तींचे पोषाख भरजरीच असत. पीतांबर हे वस्त्र देखील याच पद्धतीने विणले जाई. केवळ त्यास पदर नसे आणि पैठणीस पदर असे एवढाच काय तो फरक!

**पैठण येथे पूर्वी साळीवाडा, तारगल्ली, रंगारहाटी, पावटेगल्ली, चपडेगल्ली, सुतारपार, संजरपूरा, पटवेकर गल्ली एवढ्या मोहल्ल्यातून पैठणी महावस्त्रासाठी विविध प्रक्रियेचे काम मोठ्या प्रमाणावर चालत होते.**





पूर्वी हस्तजर तयार करताना रेशमावर बादले गुंडाळल्यामुळे रेशीम प्रत्यक्ष दृश्य रूपात दिसत नसे परंतु वरील 'जर' मात्र बादल्याच्या अंगभूत गुणामुळे आकर्षक दिसत असे.



## 'पैठणी'वरील जुनी व नवी चित्रकृती

पैठण्या या दोन प्रकारांनी विणल्या जातात; परंपरागत आणि भरजरी (ब्रॉकेड). परंपरागत पैठणीत नारळी वेल, पंखा, रुईफूल, आणि कळस पाकळी ही नक्षी पैठणीच्या काठावर आणि पदरावर असावली आणि आकृटी ही नक्षी विणली जाते. ही पैठणीवरील सर्वांत जुनी नक्षी आहे.

याशिवाय काळाप्रमाणे पैठणीच्या काठा–पदरावर सतत नक्षी बदलत गेली आहे. शालीवाहन काळात बगळे, हंस यांची चित्रकृती पदरावर विणली जात असे, तर यादवकाळात सुवर्णकमळ विणले जाई. मोगलकाळात



मात्र अनेक प्रकारची फुले, पक्षी, झाडे यांच्या चित्रकृती पैठणीच्या काठापदरावर विणल्या जाऊ लागल्या.

पैठणीवर बांगडीमोर, अजिंठा कमळ, झाड, तोता–मैना, हुमा परिंदा, बेहेस्थी परिंदा, द्राक्षवेल, कैरीवेल, अनारवेल, गोकर्णवेल, फुलपत्ती या नक्षीही विणल्या जातात. यामध्ये कलाकाराचे मोठे कौशल्य असते. या पैठण्या विणावयास परंपरागत पैठणीस साधारण दीड महिना लागतो तर ब्रॉकेड पैठणीस ५ ते ९ महिने एवढा दीर्घ कालावधी लागतो.

पैठणीचा दिमाख, तिचा डौलदारपणा अधिक वाढविण्यासाठी निरनिराळ्या प्रकारच्या ५०० ते ९०० बुट्ट्या सहज विणल्या जातात. या बुट्ट्या म्हणजे पैसा, तारा, फूल, पाने, मोर, पोपट यांच्या चित्रकृती असतात.

## पैठणीची रंगसंगती

रंगावरून पैठणीला मोठे काव्यात्मक नाव प्राप्त होते. उदा. काळ्या रंगाची 'काळी चंद्रकळा' तांबडा, गुलाबी व हिरवा मिळून होणारी 'पसीला', काळा आणि पांढरा मिळून तयार होणारी गुजरी, पिवळ्या रंगाची 'पोफळी', फिक्कट काळसर रंगाची 'उडदानी', निळ्या रंगाची 'निळीगुंजी', काळा आणि तांबडा मिळून होणारी 'मिराणी', हिरवा आणि निळा मिळून होणारी 'मोरपंखी', पांढरा आणि हिरवा फिक्कट मिळून होणारी 'फिरोझी', हिरवा आणि लाल मिळून होणारी 'संप्रूस', जांभळा आणि लाल मिळून होणारी 'धूपछांव', फिक्का गुलाबी 'मोतीया', पांढरा 'क्षीरोदक', मेघवर्ण, गरुडनीळ, किरमिजी, आकाशी, पोपटी, हिरवा, तांबडा, गुलाबी, जांभळा, भगवा इत्यादी.

पैठण शहरात पैठणीशिवाय इतरही विविध प्रकारच्या रेशमी वस्त्रांचे विणकाम होत असे. त्यात प्रामुख्याने पीतांबर–कद–मुकटे–सोवळे, बत्ती, शेला, दुपेटा, ओढणी (तुक्का), पट्टी, खाणावळ यांचा समावेश होतो. यासाठी पैठणचीच हाताने तयार केलेली जर वापरण्यात येत असे. आजही आपण जुनी पैठणी काढून तिचे जरतारी काठ जाळले तर सोन्याचा गोळा तयार झालेला दिसून येईल. यावरून 'पैठणी' हे एकच वस्त्र असे आहे की ते दीर्घकाळ टिकतेच टिकते, शिवाय फाटल्यावरही दाम देऊन जाते!



# चिरयौवना

**सुमारे दीडशे वर्षांपूर्वी विणलेल्या पैठण्या आजही आपलं राजस रूप राखून आहेत**

*१५० वर्षांपूर्वी विणलेली आसावली नक्षीचा काठ असलेली पैठणी. नक्षीचे बारकावे आणि रंग अजूनही उठून दिसत आहेत. नक्षीचा हा प्रकार पेशवेकाळात विकसित झाला होता*





काठावर दुर्मीळ पंखा नक्षी विणलेली १०० वर्षांपूर्वीची पैठणी



संत एकनाथ महाराज यांच्या घराण्यातील सुमारे १८० वर्षांपूर्वी विणलेली पैठणी. काठावर नारळी नक्षी.

पैठणीच्या काठापदरावरील डोळ्यात भरणारी हस्तजराची चमक आणि त्यांचे लोभस रंग...





संक्रांतीला आवर्जून नेसली जाणारी सुमारे १०० वर्षांपूर्वीची तलम चंद्रकळा



पैठण्यांमध्ये खास पारंपरिक समजल्या जाणाऱ्या कुसुंबी रंगाची पैठणी व त्यावरील सुप्रसिद्ध चौकडी. ही दीड किलो वजनाची साडी आणि दोनेक किलो सोन्याचे अलंकार लेवून पूर्वी स्त्रिया पंगती वाढत असत, अशी माहिती मिळते



**पूजादि पवित्र कार्य करण्यासाठी जसे जरतारी पीतांबर हे महावस्त्र वापरण्यात येते, त्याचप्रमाणे स्त्रिया मंगल प्रसंगी, सणावाराला आणि देवपूजेला जाताना पैठणीसारखे महावस्त्र नेसूनच जातात**




## पैठणीवरील प्राचीन नक्षी :

पैठणीवर विणल्या जाणाऱ्या प्रत्येक नक्षीला स्वतंत्र वारसा आहे. लोकांच्या आणि राजघराण्यांच्या आवडी–निवडीचा त्यावर प्रभाव आहे. लोक परंपरेत अशी एक समजूत आहे की, महावस्त्रावर देवदेवतांचा अधिवास असतो. म्हणूनच त्यावर विणल्या–जाणाऱ्या नक्षींनासुद्धा पावित्र्याचे लेणे लाभते. पूजादि पवित्र कार्य करण्यासाठी जसे जरतारी पीतांबर हे महावस्त्र वापरण्यात येते, त्याचप्रमाणे स्त्रिया मंगल प्रसंगी, सणावाराला आणि देवपूजेला जाताना पैठणीसारखे महावस्त्र नेसूनच जातात, ते या पावित्र्याच्या लोकसमजुतीमुळेच.

आज पैठणीवर विणल्या जाणाऱ्या नक्षींवरून पारंपरिक जरतारी बुट्टेदार पैठणी आणि कलाकुसरींनी युक्त मुघल परंपरेतील (ब्रॉकेड) पैठणी हे पैठणीचे दोन प्रकार मानले जातात.

पारंपरिक पैठणी ही नक्षीच्या दृष्टीने आकृतीप्रधान असते. या प्रकारच्या पैठणीत विणल्या जाणाऱ्या नक्षींचा तोल ढळत नाही. प्रमाणबद्ध अशा सरळ, तिरप्या रेखा, कोन आणि वर्तुळे भौमितीय पद्धतीची असतात. त्यामुळे या नक्षींना विलक्षण गतिमानता प्राप्त होते. या प्रकारातील पैठणीत किनारीवर नारळी, साधा पंखा, जाळीदार पंखा, आकृटी (झिपृटी) किंवा अक्रोडी, आसावली (आषृगोली), कळसपाकळी रुईफूल, अष्टकवळ (कमळ) कुयरी, हंसादी नक्षी यांचा समावेश होतो. यातील साधा पंखा, जाळीदार पंखा आणि नारळी ही नक्षी पैठणीच्या फक्त काठावरच विणली जाते. पदरावर विणली जात नाही. इतर सर्व नक्षी काठावर आणि पदरावरही विणल्या जातात. तसेच रुद्रगंठी, शिकारखानी, प्राचीन आकृतीबंधाची झाडे, अलंकृत कुयरी ही नक्षी पदरावर विणली जाते. यापैकी काही निवडक नक्षीकाम पुढे दर्शविले आहे...



**नारळी नक्षी :**

पैठणीच्या आणि पीतांबराच्या काठावर विणली जाणारी नारळी ही सर्वात प्राचीन नक्षी समजली जाते. आजही जुन्या पैठण्यांवर आणि पीतांबराच्या काठावर नारळी नक्षीच प्रामुख्याने आढळते. पैठणीच्या काठावर (किनार) ओळीने आठ नारळ किंवा त्यापेक्षा अधिक नारळ ओळीने विणल्यामुळे दिसणारी जाळीदार नक्षी संपूर्ण किनारीला अधिकच शोभा आणते. शिवाय लाल रेशमाच्या किनारीत जरतारी नारळी नक्षी अधिकच खुलून दिसते.

*पैठणीच्या आणि पीतांबराच्या काठावर विणली जाणारी नारळी ही सर्वात प्राचीन नक्षी समजली जाते.*



**पंखा :**

ही नक्षीही परंपरागत, प्राचीन, जाळीदार आहे. पंखा हा नारळी नक्षीपेक्षा काहीसा चपटा असतो. प्राचीन पैठणीवर आणि पीतांबरावर ही नक्षी विशेषत्वाने आढळते. सतराव्या शतकात येवला शालू व येवला पीतांबराची निर्मिती झाली, त्या वेळेपासून ही नक्षी अधिक प्रचलित झालेली दिसून येते.


**आकृटी (झिपृटी) :**

नारळी किंवा पंखा ही नक्षी पैठणीच्या काठावर विणल्यानंतर पदरावर आकृटी ही नक्षी हमखास विणली जाते. ही नक्षी काठावरही विणली जाते. तसेच पदराच्या गोलात याच नक्षीचे तीन किंवा पाच असे ओळीने झाडांचे आकृतीबंध विणले जातात. या नक्षीला सातवाहनकालीन परंपरा आहे. या नक्षीला अक्रोडासारखा भौमितीय आकार आहे.

**आसावली :**


ही अत्यंत सुरेख अशा फुलांची एक देखणी वेल आहे. रंगीबेरंगी रेशमाच्या साह्याने पैठणीच्या सोनसळ्या काठपदरावर ही नक्षी प्रामुख्याने विणली जाते. सातवाहनकालीन नक्षी म्हणून या नक्षीला विणकर जगतात ओळखले जाते.

*पंखा*





*आकृटी*





*आसावली*





**कळस पाकळी :**

अत्यंत पवित्र अशी ही प्राचीन नक्षी होय. पैठणीच्या तसेच पीतांबराच्या काठावर ही नक्षी पूर्वी अधिक विणली जात असे. अलीकडे या नक्षीचे अस्तित्व जाणवत नाही.

**रुईफूल :**

रुईफूल हे चार किंवा आठ पाकळ्यांत विणले जाते. जरतारी काठावर या फुलांची सुंदर जाळी तयार होते. या नक्षीतील चार पाकळ्यांना चार वेद, चार मुक्ती, चार दिशा असा प्रतीकात्मक अर्थ आहे.

**सुवर्ण-कमळ :**

यादवकालीन साहित्यात या नक्षीचा उल्लेख येतो. पैठणच्या जुन्या मठाच्या छतावरही या नक्षीच्या खुणा आढळतात. या आठ पाकळ्या असलेल्या कमळाच्या फुलातून अष्टचक्राचा बोध होतो. आज बहुतेक पैठणीच्या काठा-पदरावर अशी कमळाची प्रतिकृती विणली जात नाही, तर अजिंठ्याच्या छतावरील कमळाची वेलबुट्टी विणली जाते.


**हंस :**

पैठणीच्या पदरावर गोलात उडत्या हंसाची नक्षी विणली जात होती असे सातवाहनकालीन इतिहास सांगतो. आज या नक्षीची जागा मुघल परंपरेतील हुमा परिंदा आणि बेहेस्थी परिंदा या नक्षींनी घेतली आहे.





सुवर्णकमळ





हंस

**यादवकालीन साहित्यात या नक्षीचा उल्लेख येतो. पैठणच्या जुन्या मठाच्या छतावरही या नक्षीच्या खुणा आढळतात.**




**'बांगडीमोर' म्हणजे गोल पृथ्वी, चार मोर म्हणजे विष्णूचे चार हात, चार पाकळीचे कमळ म्हणजे नारायणाचे नाभी कमळ म्हणून सृजनात्मक आहे. यालाच सूर्याचे प्रतीकही मानतात.**

**बांगडी मोर :**

बांगडी मोर ही नक्षीही प्राचीन आहे. निजामाच्या सुना दुर्देशहवार व निलोफर या स्वतः पैठण येथे श्री. सोनाजीराव लेंभे यांच्या घरी पैठणीची मागणी नोंदविण्यासाठी आल्या होत्या. त्यावेळी त्यांनीही 'बांगडीमोर' या नक्षीच्याच पैठण्या विणून नेल्या होत्या. आजही ही 'बांगडी मोर' नक्षींची पैठणी हैदराबाद येथील सालारजंग म्युझियममध्ये पाहावयास मिळते.

अशा नक्षीची पैठणी विणावयास एका मागावर चार विणकर नक्षी विणण्याचे काम करीत व त्यांना किमान एक ते तीन वर्षे सहज लागत. यातील बांगडी म्हणजे गोल पृथ्वी, चार मोर म्हणजे विष्णूचे चार हात, चार पाकळीचे कमळ म्हणजे नारायणाचे नाभी कमळ म्हणून सृजनात्मक आहे. यालाच सूर्याचे प्रतीकही मानतात.





बांगडी मोर


**पारंपरिक कुयरी :**

कुयरी ही नक्षी तशी जुनीच आहे. पूर्वी ही नक्षी केवळ पदराच्या गोलात तीन किंवा पाच या संख्येत ओळीने विणली जात होती. परंतु आज थोडा बदल करून ही नक्षी पैठणीच्या काठापदरावर विणली जात आहे.

**पैठणीवरील नक्षीची मुघल परंपरा :**

मुघल परंपरेतील पैठणीवरील नक्षींचे वेगळे वैशिष्ट्य आहे. या प्रकारातील नक्षी पैठणीच्या काठा-पदरावर विणताना रेशमाच्या उभारात खाली नक्षीचा कागद ठेवून विणल्या जातात. 'हुमा परिंदा', 'बेहेस्थी परिंदा', 'अनारवेल', 'तोता-मैना', 'कैरीवेल', 'अजिंठा लोटस', 'फुलपत्ती' इत्यादी नक्षी या प्रकारात सोप्या करून विणल्या जाऊ लागल्या आहेत. या परंपरेतील नक्षी आजही पैठणीच्या काठा-पदरावर विणल्या जातात. अलीकडे या परंपरेतील पैठणीला 'ब्रॉकेड' असे संबोधले जाते.





कुयरी


**हुमा परिंदा :**
'हुमा परिंदा' हा खास करून पैठणीच्या पदरातील गोलातच विणला जातो. काठावर बहुतेक ही नक्षी विणली जात नाही. सोनसळी जरतारी पदरावर या पक्ष्याला विविधरंगी रेशमाचा साज देऊन सुंदर रूप प्रदान केले जाते.
'हुमा परिंदा' याचा अर्थ आहे, स्वर्गातील पक्षी. तो अगम्य उंचीवर आपले घरटे बांधतो. घरट्यातून त्याची अंडी पडतात. पडता पडताच ती उबतात. त्यातून पिल्ले निघून ती आकाशातच उडायला लागतात. त्याचे पाय जमिनीला कधी लागतच नाहीत, इतक्या उंचीवर त्याचे घरटे असते अशी ही संकल्पना आहे.






*हुमा परिंदा*

**अनारवेल :**
पैठणीच्या काठावर आणि पदरावर विणली जाणारी ही एक सुरेख वेलबुट्टी आहे. यात डाळिंबाच्या फळांची सुरेख रचना करून त्यांना पानाफुलात जखडून त्याचा वेल सोनसळी काठावर विणला जातो. ही नक्षी एका पैठणीवर विणायला दीड ते दोन वर्षे सहज लागतात. काही कुशल कारागीर ही नक्षी ट्रेसिंग पद्धतीने (रेशमाच्या उभाराखाली नक्षीचा कागद ठेवून) न विणता तातू मोजून हातकाढणीने सहज विणतात. असे विणकाम खूप अवघड असते.



*अनार वेल*

**तोता-मैना :**
सुंदर अशा वेलीवर ऐटदार पोपटांच्या रंगीत आकृतींना विणकर पैठणीच्या काठावर विणून संजीवन देतो. मुघलांची ही अतिशय आवडती नक्षी आहे. आजही ही नक्षी पैठणीवर मोठ्या प्रमाणावर विणली जाते.





*तोता-मैना*



अनारवेल पैठणीच्या काठावर आणि पदरावर विणली जाणारी ही एक सुरेख वेलबुट्टी आहे. यात डाळिंबाच्या फळांची सुरेख रचना करून त्यांना पानाफुलात जखडून त्याचा वेल सोनसळी काठावर विणला जातो.

**अजिंठा लोटस :**
अजिंठा छतावरील ही अतिशय सुंदर नक्षी पैठणीच्या काठावर खूपच सुरेख दिसते. मुघलांनी ही नक्षी अधिक लोकप्रिय केली. आजही या नक्षीच्या पैठण्या विशेषत्वाने विणल्या जातात. कमळाची पाने, फुले, कळ्या, पक्षी यांची नाजूक गुंफण करून त्याची वेलबुट्टीत एकसंध मांडणी करून या नक्षीला पैठणीच्या काठावर विणले जाते. प्रस्तुत नक्षी ही अजिंठा छतावरील असल्यामुळे तिला प्राचीन वारसा आपोआपच लाभतो. फक्त मुघल परंपरेत तिचे पुनरुज्जीवन झाले एवढेच. यादवकालीन साहित्यात या नक्षीचा उल्लेख आढळतो.






*अजिंठा लोटस*

**मुनिया/ गणेशपट्टी :**
गणपतीच्या सोंडेसारखा आकार असल्यामुळे या नक्षीला गणेशपट्टी म्हणत असत, परंतु मुघलांच्या काळात तिला मुनिया म्हणू लागले.






*मुनिया/ गणेशपट्टी*

अजिंठा छतावरील ही अतिशय सुंदर नक्षी पैठणीच्या काठावर खूपच सुरेख दिसते. मुघलांनी ही नक्षी अधिक लोकप्रिय केली. आजही या नक्षीच्या पैठण्या विशेषत्वाने विणल्या जातात.



## अस्सल पैठणी कशी ओळखावी

- पैठणीचे रेशीम अस्सल आहे की नाही हे तपासून पाहण्यासाठी रेशमाचा तातू जाळून पहावा. जळणाऱ्या तातूचा केस जळल्यासारखा वास येतो. तसेच जळालेल्या तातूची गोळी तयार होते. तेच खरे रेशीम होय. तसेच खरी 'जर' काळी पडत नाही. खरी जर जाळल्यास त्यातून सोने व चांदी हे मौल्यवान धातू मिळतात. खोट्या जरीत या धातूचा अंश नसतो.
  खरी पैठणी हातमागावर विणली जाते
  खऱ्या पैठणीचे विणकाम तिढी/आढी (इंटरलॉक) पद्धतीने केले जाते. त्यामुळे विणकाम उलट व सुलट बाजूने सारखे दिसते. उलट बाजूने कुठल्याही प्रकारचे धागे सुटलेले दिसत नाही.
- खऱ्या पैठणीचे विणकाम अतिशय घट्ट असते व त्याचा पोत अशाप्रकारे असतो जेणेकरून ही साडी पिढ्यान्‌पिढ्या टिकावी.
- खऱ्या पैठणीमध्ये काठ व पदराला रेशमाचा उभार घेतला जातो व आडवा धागा जरीचा वापरला जातो. काठावर व पदरावर असलेली वेलबुट्टी ही वेगवेगळ्या रंगाच्या धाग्यांनी विणलेली असते.
- खऱ्या पैठणीच्या काठावरील/पदरावरील नक्षीकाम याचे अंजठा लेणीतील पेंटिंगशी बहुतांशी साधर्म्य असते. यामध्ये कमळ, मोर, पोपट, कुयरी इत्यादी कलाकृतींचा विशेषत: अंतर्भाव असतो.









## पैठणीची काळजी

- पैठणी ही अनेक बाबतीत अनमोल असल्यामुळे तिचे जतन करणे आवश्यकच आहे.
- पैठणीला जास्त घड्या पडणार नाहीत किंवा ती चुरगळणार नाही याची काळजी घ्यावी.
  दमट हवामानात शक्य तितक्या कमी वेळा पैठणी वापरावी. ती ओली होऊ देऊ नये.
  पैठणीवर कुठलेही डाग पडणार नाहीत याची काळजी घेणे हे तर ओघाने आलेच.
  हे अतिशय टिकाऊ महावस्त्र आहे. पाच ते सहा पिढ्या एक पैठणी सहज टिकते. त्यामुळे ती पाण्यात धुवू नये.
- पैठणीवरून कडक इस्त्री फिरवू नये. पैठणीचे रेशीम हे जैविक असल्यामुळे गरम इस्त्रीने ते जळते व त्याचा गोळा तयार होतो.
- पैठणी कागदाच्या घडीतही ठेऊ नये कारण कागद तयार करण्यासाठी ज्या रसायनांचा वापर केला जातो त्यांचा पैठणीवर परिणाम होऊन तिला छिद्रे पडतात.
- पैठणीला शक्यतो टाचण्या किंवा सेफ्टी पिन्स टोचू नयेत.
- पैठणीवर डाग पडल्यास तज्ज्ञाच्या सहाय्याने धुवून काढावेत. त्यासाठी गरम पाणी वापरू नये.
- पैठणी वापरून वापरून चुरगळल्यास ती विणकराकडून पुन्हा मागाच्या ठुणीवर पाण्याची फुंकर मारून गुंडाळून ठेवावी. त्यानंतर नव्या पैठणीला घडी घालतात त्याप्रमाणे संपूर्ण पैठणीवर साखरेच्या पाण्याची फुंकर टाकून पैठणीची घडी घालावी. ती पैठणी अगदी नव्यासारखी चमकते.
- पैठणीचे काठ चुरगळले गेले असल्यास लाकडी चोपड्या पट्टीवर काठाचा भाग ठेवून तो मोठ्या कवड्याने घासावा. त्यामुळे जराला चमक येते. अशा प्रकारे पैठणीचे दोन्हीकडील काठ व पदर घासावे लागतात, तेव्हा काठ व पदर चमकदार दिसतो.
- पैठणीमध्ये एका पुरचुंडीत तंबाखूची पाने गुंडाळून ठेवल्यास पैठणीला वाळवी, किडे लागत नाही. तसेच या पानांमुळे हवेतील दमटपणा शोषून घेतला जातो.



# पैठणीतील काव्य व काव्यातील पैठणी

## मराठी वाङ्मयातून प्रतीत होणारे पैठणीचे सौंदर्य



अनेक ऐतिहासिक शिल्प आणि वाङ्मयातून पैठणीच्या सौंदर्याचे वर्णन केलेले आहे. शाहिरांनीही आपल्या कवनांतून तिचे सौंदर्य श्रोत्यांसमोर उभे केले आहे. संत एकनाथ आणि अनाम कवींच्या साहित्यात पैठणच्या महावस्त्रास पैठणी म्हटलेले आढळते व त्यावर स्वतंत्र कवनेही आढळतात. महानुभावीय वाङ्मयात पैठणमध्ये तयार होणाऱ्या वस्त्रांच्या निर्मितीची, तिच्या कलात्मक गुणांची माहिती आढळते.

महदंबेचे 'धवळे' हे मराठीतील आद्य आख्यानक काव्य. या काव्यात लग्नप्रसंगी अहेर देण्याच्या प्रथेतून भरजरी वस्त्रांचा जो उल्लेख आलेला आहे तो असाः

'मालगंठी नेसला सोनेसळा,' 'पितांबर देवो नेसले सोनसळा',

'श्रीयेचे परमधाम क्षीरोदक नेसले मुरारी'...

यातील मालगंठी, क्षीरोदक, पितांबर ही सर्व भरजरी रेशमी वस्त्रांचीच नावे असून मालगंठी आणि पितांबर एकच आहेत. पितांबर आणि पैठणीत फरक एवढाच की पितांबराला पदर नसतो तर पैठणीला भरजरी पदर असतो.

त्याचप्रमाणे नरेंद्राच्या रुक्मिणी स्वयंवरातील रेशमी वस्त्रांचे उल्लेख मनाला मोहून टाकतात.

ही वस्त्रे इतकी तलम आणि मुलायम असत की, त्यातून सर्वांग उमटून दिसत असे.

१. ***कास्मिराचिये करंडिये जैसे । भीतरी मूर्ति प्रकासे,***
***पातळालुगडियांतूनि तैसे । अवएव दिसताती ।।८३।।***
२. ***कनकाची वेली सुपुर । पातळा मोतियाचा मुहुर ।।५५।।***
३. ***तया नानाविध शृंगार । कळियाचे लेणे अरुवार***
***मृनाळवोली सेले सुपुर । चांदिणेया पासोनि ।।८४१।।***
४. ***राऊळे वेढुनि पोफळ गांठी । वाखोरिया देऊनी वाय गांठी***
***येकी ताणूनि कुचतटी । खांदेसी अंकुश आणिती ।।८४२।।***
५. ***तेथे कपुर केळिचा डोल्हारा केला । तो मृनाळ सुताचेनि पाटे विणिला***
***सोने कमळांचा जळी लांविला । गोफु गुफोनिया ।।८४३।।***

तलम रेशमी वस्त्रावर सोन्याच्या तारांनी (जरीने) विणलेली कमळ–फुलांची नक्षी. पातळा मोतियांचा मुहूर म्हणजे बुट्टेदार पैठणी. गुलाबी रंगाचे शेले, पोफळी (नारळी नक्षी) पिवळी पीतांबरे, क्षीरोदक म्हणजे शुभ्रवस्त्र, फुटा वगैरे वस्त्रांच्या प्रकाराची, रंगाची आणि त्यात विणल्या जाणाऱ्या नक्षीची माहिती महत्त्वाची ठरते.

नरेंद्राच्या 'रुक्मिणी स्वयंवरा'प्रमाणेच भास्कर भट्ट बोरीकरांच्या 'शिशुपाल वधात'

ही भरजरी वस्त्रांची आणि त्यांच्या तलमपणाची ओळख पटते.

१. ***कनकाकांतिये वाले ।***
***जया वेळा वेळा दिधले ।।***
***तीए वेढिले पातळे ।***
***सोनेसळी ।।३९१।।***





*२. देव्हडिया नेवीला खोवलिया । खळत नीरीया*
*ओखुडिलीया*
*पोफळ गांठी सेले नेसलीया ।*
*सुंदर तीया ।।६५३।।*
*३. मृणाल सुताचे वेलिसेले ।*
*तुआं खासटे म्हणोनि*
*वेढूं सांडिले तीए*
*चंद्रकळेसी काडा जाले ।*
*कैसि थाटे साडाती असे ।।६९२।।*
*४. पूर्णचंद्रा आडुनि आभाळ काढले।*
*की शृंगाराचे पाहाळ उघडले*
*तैसे अवयव उमटले ।*
*वालिये आंतोनि ।।७१९।।*

'धवळे' आणि 'रुक्मिणी स्वयंवरा'प्रमाणेच 'शिशुपाल वधात' ही सोनसळी पातळें (पैठणी) पोफळगंठी सेले (पिवळा नारळी पीतांबर), वालिपे म्हणजे अत्यंत झिरमिरीत रेशमीवस्त्र असे या काव्यात वस्त्रांचे महत्त्वपूर्ण उल्लेख सापडतात. यात अत्यंत झिरमिरीत वस्त्रांचा जो उल्लेख आलेला आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे. कारण पैठणमध्ये सातवाहन काळापासून अशा वस्त्रांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होत होती. तीच परंपरा यादवकाळातही चालू होती असेच यावरून दिसून येते.

या काव्याप्रमाणेच 'सूत्र–पाठातील' प्रसाद सेवा या प्रकरणात कोसल्याच्या म्हणजे रेशमांच्या वस्त्रांचा उल्लेख आलेला आहे.

तो असाः

*आता कोसले आंतु समग्र पाटाऊ आली : बारवेचा फुटा :*
*जगळदेरणेयाची रामदरणे याची त्रीवडी : दामोसाची त्रीवडी :*
*क्षिरोदक फुटा : सारणेर फुटा : म्हाइर्दसाचिया वस्त्रांची धारी :*
*गरुडनीळ दुटी : पाटाउवा वस्त्र संबंधासी माझे दंडवत :*

अशा महानुभवीय प्रसादतुल्य वस्त्रातील 'पाटाऊ' 'दुटी', 'मेघावर्णी वस्त्रे', सोनसळा फुटा', 'क्षीरोदक फुटा', 'वस्त्रांची धारी म्हणजे काठ', 'गरुडनीळ दुटी' अशा विविध प्रकारची ही रेशमी वस्त्रे यादवकालीन वैभव सांगत आहेत. यादवकालीन लोकजीवनातील वस्त्रप्रावरणांची, कलात्मक सौंदर्याची आणि राहणीमानाची सहज कल्पना या साहित्यातून मिळते.

महानुभाव साहित्याप्रमाणेच संत वाङ्मयातूनही जरतारी महावस्त्राचे वैभव आपणास पाहावयास मिळते. संत नामदेवांच्या काही अभंगांतून दिसणारे पीतांबराचे सौंदर्य असे आहे:

*१. कौस्तुभ निर्मळ वैजयंती माळा ।*
*कासे सोनसळा हाटकवर्ण*
*२. रक्त पीतांबर आरक्त अधरा ।*
*चरण सुंदर चालताती*
*३. चरणी तोडर पीत पीतांबर ।*
*तेणे दिवसाकर लोपतसे*
*४. हाती तुझ्या कवळ शोभे पीतांबर ।*
*चरण सुंदर तुज नमो.*
*५. गुंजाहार गळा वैजयंती माळा ।*
*कासेसी पिवळा पीतांबर*

यातून सोनसळ्या पीतांबराचे रंग वैभव प्रतीत होते. रक्त पीतांबर (लाल पीतांबर) पीत पीतांबर (पिवळा पीतांबर) होय. संत नामदेवाप्रमाणेच संत जनाबाईच्या अभंगातूनही पिवळ्या पीतांबराचे तेज प्रतीत होते ते असे.

*१. झळके पीतांबर कासे ।*
*नयनी कोंदण प्रकाशे*
*२. पीतांबर नेसुनिया पिवळा ।*
*गळा तुळशीच्या माळा*
*की रूप सुंदर सावळा ।*
*तेज झळके झळाळा.*

तसेच अनाम कवीच्या 'द्रौपदीच्या धाव्यातील' पैठणी आणि त्यावरील नक्षीचा उल्लेख अधिक लक्षणीय ठरतो.









***‘जरी किनारी पदर नारळी पीतांबर पिवळा***
***कळसपाकळी लेऊन गुलतापी पैठणी पातळा***
***चंद्रकला शेलारी कुसुंबी बसंतिरंगी बहु***
***पर्वतपडले गतणिती नाही मुखी कुठवर गाऊ’***
***– अनामकवी (द्रौपदीचा धावा)***

या काव्यातील नारळी, कळसपाकळी, ही परंपरागत पैठणीवरील अत्यंत प्राचीन नक्षी
असून, चंद्रकला (काळा) पिवळा,
कुसंबी हे रंगाचे उल्लेख तत्कालीन पैठणी उत्पादनाच्या
विविधतेचे महत्त्व सांगून जातात.
याशिवाय श्री. अनंतनाथ यांच्या काव्यातूनही पैठणच्या
रेशमी वस्त्रांचा उल्लेख आढळतो.

पंचीकरण

***‘वस्त्र आणिले अंग पुसण्या । मोल माप ना श्रेष्ठ देखणा।***
***वास रेशमी भास भक्तिचा । हे मृदू तंतु निहिचा।’***

वस्त्रधारणा

‘कटी तटीं बरा उंच रंगीचा । अरुण कांतिचे तेज दिप्तीचा ।
सुपट पिवळा देव नेसले। मन मनामधी सांचले’

उपवस्त्र

‘जरीची उत्तरी शाल जोडिही । बुटविधी नवी सुक्षमी सुही ।।
जडित जोडणी स्कंधी जोडिली । सुखकारा उरी दिव्य शोभली ।।’

अशा प्रकारे संतांच्या वाङ्मयातून आध्यात्मिक अर्थ लेवून पैठणी आणि तत्सम वस्त्रांचे दर्शन घडते. यामध्ये नाथांचे पैठणीवरील एक रूपक पाहण्यासारखे आहे.

गुरुनं लहेर मजवरती केली पैठणी नेसाया दिली... ।।धृ।।
करवती काठ बुगडीचे । चाटी निर्गुण गावाचे
नारळी पदर टोपाचा । रंग भरीला त्रिगुणीचा
सोमसुयानं जाळी भरिली । पैठणी नेसाया दिली ।।१।।



*नारळी, कळसपाकळी ही परंपरागत पैठणीवरील अत्यंत प्राचीन नक्षी असून, चंद्रकला (काळा) पिवळा, कुसंबी हे रंगाचे उल्लेख तत्कालीन पैठणी उत्पादनाच्या विविधतेचे महत्त्व सांगून जातात*



श्री स्वामी रामानंद विरचित संपादण्यातही या वस्त्रांचा उल्लेख आढळतो तो असा.



**पिवळा शालू बासणातील गडे**
**उंच दोन मजलीचारे**
**तू नेस राजसबाळी**
**पिवळा रंग भर ज्वानिचारे**

यातून पैठणीच्या लांबीची कल्पना येते. शिवाय तिच्या पिवळ्या रंगातून तारुण्यसुलभ भावनांचीही झलक दिसते.

रेशमी धागा सत्वाचा । आकार ब्रह्मदेवाचा।
धर्म नेतीचा चुडा भरी। बहीण भावाच्या घरी।
पाहा तिचा थाट । या परी रंजूनपूर माहेर ।
निघाले संताचे घर । पैठणी नेसाया दिली ।।२।।

सगुनामध्ये आकारली । निर्गुणामध्ये ओळख झाली
तिनसेसाठ हजार दोऱ्यांनी विणली । पैठणी नेसाया दिली ।।३।।

पैठणी साठी झाले माझे मन ।
पैठणी आली देवानं ।
गंगा जमुना सरस्वती जाण ।
अन् पैठणी आण धुऊन ।
पैठणी ती पहिली ।
सद्‌गुरू चरणी जडली
गुरुनं लहेर मजवरती केली ।
पैठणी नेसाया दिली ।।३।।

रूपकातील करवती काठ ‘बुगडी, नारळी, ही सर्व पैठणीवरील पारंपरिक नक्षींची नावे होत. शिवाय पैठणीसाठी वापरण्यात येणाऱ्या तातूंची संख्याही दर्शविली आहे. हे रूपक आध्यात्मिक असून, वैशिष्ट्यपूर्ण आहे.

हे मराठी वाङ्मय आणि त्यातून प्रतीत होणारे पैठणीचे रूपदर्शन मनाला मोहून टाकते. ज्याप्रमाणे महानुभाव वाङ्मय, संत वाङ्मयातून पैठणीची वैशिष्ट्ये पाहावयास मिळतात, त्याचप्रमाणे जैन मराठी वाङ्मयातूनही पैठणीसंबंधी माहिती मिळते.

१) पटाऊ बहुलाल जोरकसीचा ।
**त्या माजि बुट्टा किती**
**मध्ये सारसहंस थोर रचना**
**मोरचिया पंगती**
**ल्याली ते कटीसूत्रही कटितटी**
**बाळ बहू शहानी**
**हाती कंकण घातले घडलिया**
**रत्नाचिया जोडणी**
– (जिनसागर यांची समग्र कविता पृ. ८०)

**२) चिंचपेट्याच्या कड्या रुंद**
**नवरीला बाजूबंद**
**बाजूबंदात गोंडे लाल**
**नवरीला हिरवी शाल**
**हिरव्या शालीला दशा काळ्या**
**नवरीला बेल बाळ्या**
– (जैन लोक वाङ्मय विहण पृ. ४४८)

३) नवमेळी कुसुमांची गुंफीयली वेणी
**पीतांबर पट शोभा लखलखती वेणी**
– (जैन सागरकृत पद्मावती आरती पृ. ४४८)

४) विहिणीबाईचा रुसवा
**पोट झाकणीला**
**घेईन हजाराची पैठणी**
**उशीर किती झाला**
**उठा उठा विहिणी**
– (जैन लोकगीते पूर्वार्ध पृ.४०९)

५) लाडकी पुन्हा ती मंजुळवाणी बोलती पतीला
**बारिक हालका बल मोत्याचा**
**शालू गडे आणावा**
– (डोळाळे पृ. ४५० जैन वाङ्मय)

६) माथा मोतियाची जाळी ।
वेणी जैसी शोभे चाफेकळी
चंद्रकला तैसी झळकली ।
शोभा लाधली सुंदर
(जिनसागरकृत पुराण अ.६ वा ओ.१६)

७) त्याने ओढ सुरंग गाठा ।
दंत दाढा साजिऱ्या
पाटाऊ नेसली पिवळा ।
त्यावरी कमळाचा ठसा.

जैन वाङ्मयातून आपणास पैठणीवरील नक्षी सारसहंस, मोर, कमळाचा ठसा, इत्यादीची माहिती मिळते. पिवळी, लाल, हिरवी, काळ्या रंगाची पैठणी आपलं रंग सौंदर्य सांगून जाते. ही पैठणी वजनानं किती हलकी असते त्यावेळी तिच्या किंमती हजाराच्या जवळपास असल्याचा उल्लेखही या साहित्यातून होतो.







ही कला १९७७ मध्ये लोप पावण्याच्या स्थितीत असताना महामंडळाने शासकीय अनुदानातून पैठणी केंद्र, पैठण येथे महिलांसाठी पैठणी विणकाम प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली. या प्रशिक्षणातून निष्णात कारागीर तयार करण्यात आले. तसेच या कारागिरांना कच्च्या मालाचा पुरवठा व पक्क्या मालाच्या विक्रीची हमी देऊन महामंडळाने ही कला पुनरुज्जीवित केली. निरनिराळ्या शासकीय अनुदानातून प्रशिक्षण देऊन महामंडळाने गेल्या ३३ वर्षात जवळपास ९७८ कारागीर घडविले व महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून दिला.

# मऱ्हाटी

# पैठणी प्रशिक्षण व उत्पादन केंद्र, पैठण

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ हे शासनाच्या उद्योग विभागांतर्गत राज्यातील विविध लघुउद्योग तसेच हस्तकला विकासासाठी कार्यरत आहे. सन १९७३ मध्ये पैठणी प्रशिक्षण व उत्पादन केंद्र महाराष्ट्र शासनाकडून महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आले.

पैठणी विणकामाची कला सुमारे २००० वर्षांपूर्वीपासून परंपरागत चालत आली असावी असे मानण्यात येते. तथापि, पुढील काळात पैठणी विणणाऱ्या कारागिरांची संख्या कमी होत जाऊन ही कला लोप पावण्याच्या स्थितीत आली. या परिस्थितीचा विचार करून ही कला पुनरुज्जीवित व्हावी या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. त्यावेळी पैठणी केंद्रामध्ये ७ ते ८ हातमाग उपलब्ध होते. पुढे या केंद्राचा हळूहळू विस्तार करून महामंडळाने हातमागांच्या संख्येत वाढ केली. सध्या या केंद्रामध्ये अंदाजे २०४ हातमाग उपलब्ध आहेत. पैठणी विणण्याची कला जोपासणे तसेच अधिकाधिक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देऊन त्यांना उपजीविकेचे साधन निर्माण करून देणे, या मुख्य उद्देशाने पैठणी प्रशिक्षण व उत्पादन केंद्र महामंडळामार्फत चालविण्यात येत आहे.



### कलेचे जतन

ही कला १९७७ मध्ये लोप पावण्याच्या स्थितीत असताना महामंडळाने शासकीय अनुदानातून पैठणी केंद्र, पैठण येथे महिलांसाठी पैठणी विणकाम प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली. या प्रशिक्षणातून निष्णात कारागीर तयार करण्यात आले. तसेच या कारागिरांना कच्च्या मालाचा पुरवठा व पक्क्या मालाच्या विक्रीची हमी देऊन महामंडळाने ही कला पुनरुज्जीवित केली. निरनिराळ्या शासकीय अनुदानातून प्रशिक्षण देऊन महामंडळाने गेल्या ३३ वर्षात जवळपास ९७८ कारागीर घडविले व महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून दिला. समाजाच्या उपेक्षित घटकाला रोजगार उपलब्ध करून पैठणीची कला जिवंत ठेवण्याचे महामंडळाचे भरीव कार्य पैठणच्या इतिहासात नजरेआड होणार नाही. त्याची पावती म्हणून 'मऱ्हाटी' पैठणी केंद्र पैठणमध्ये तसेच भारताच्या नकाशात अढळ व अतुलनीय स्थान निर्माण करण्यात यशस्वी झाले आहे.

### महामंडळाचा सामाजिक दृष्टिकोन

पैठणी उद्योगाच्या विकासाचे मूळ उद्दिष्ट समोर ठेवून ही कला पुनरुज्जीवित करताना महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला. ह्या सर्व प्रशिक्षण योजना महिलांसाठी राबवून महामंडळाने समाजाने अपेक्षिलेल्या दुर्बल महिला घटकांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. पैठणी केंद्रात सध्या ९० टक्के महिला विणकर असून त्याची वार्षिक वैद्यकीय तपासणी महामंडळ स्थानिक सामाजिक संघटनांच्या मदतीने करून घेते. तसेच डोळ्यांची विशेष काळजी म्हणून महामंडळामार्फत महिलांना चष्मे पुरविले जातात. त्याचप्रमाणे कामाचा उत्साह वाढविण्यासाठी महामंडळ त्यांना निगडित प्रोत्साहनभत्ताही देते.

## पैठणीच्या विकासासाठी महामंडळाने केलेल्या कार्याचा आढावा

### पैठणी विणकाम प्रशिक्षण योजना

पैठणी उद्योग विकासाच्या नियोजनाचा एक भाग म्हणजेच पैठणी विणकाम प्रशिक्षण योजना.

### पैठणी डिझाईन विकास प्रशिक्षण योजना

यो योजनेअंतर्गत विकास आयुक्त (हस्तकला), नवी दिल्ली यांच्या अर्थसहाय्याने नवीन नमुन्याचे कापड तसेच पैठणीचे निरनिराळे तयार कपडे बनविण्याचे प्रशिक्षण देण्याचे काम सध्या पैठण येथे सुरू आहे. या योजनेअंतर्गत एखाद्या हस्तकलेमध्ये नवीन डिझाईन तयार करून तसेच त्यामध्ये नवीन तांत्रिक सुधारणा करून त्याद्वारे विविध वस्तू बनविण्याकरिता कारागिरांना प्रशिक्षण देणे, तयार झालेल्या नवीन डिझाईन्सच्या वस्तूंना प्रदर्शनांमध्ये सादर करून त्यासाठी मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन सदर डिझाईन्सनुसार उत्पादन करणे व या उत्पादित कलाकृतीची विक्री करणे याचा समावेश होतो. यासाठी विकास आयुक्त (हस्तकला), नवी दिल्ली यांच्यामार्फत प्रकल्प मूल्यानुसार अर्थसाहाय्य देण्यात येते.

### पैठणीचे हातमाग

पैठणीचे विणकाम हे पूर्णपणे हातमागावर करून पैठणी कला जतन करण्याचे काम महामंडळाने सातत्याने चालू ठेवले आहे. सध्या पैठण येथे लाकडी हातमागाची संख्या २०० असून त्यात सुलभतेच्या दृष्टीने विकसित केलेल्या १०० आधुनिक लोखंडी हातमागाची भर पडली आहे.

### अद्ययावत पैठणी विक्री केंद्र

महामंडळाने पैठणीचे अद्ययावत असे विक्री दालन पैठण येथे दि. ११ मे, २००५ रोजी सुरू केले आहे, जेणेकरून या उद्योगाला मोठ्या प्रमाणात चालना मिळावी. सन २००५ पासून पैठणी विक्री केंद्र पैठणची वाटचाल खालीलप्रमाणे आहे:
(रु. लाख)

### महामंडळाची विक्री दालने:

१. मऱ्हाटी हस्तकला दालन
३०,जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा,
मुंबई – ४०० ००५

२. मऱ्हाटी हस्तकला दालन
८/अ, स्टेट एम्पोरिया बिल्डींग,
बाबा खडकसिंग मार्ग,
नवी दिल्ली – ११० ००१

३. मऱ्हाटी पैठणी उत्पादन केंद्र व
हस्तकला विक्री दालन
७, बंगला संत ज्ञानेश्वर उद्यान रोड,
पैठण, जि. औरंगाबाद – ४३११०७

### पैठणी केंद्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

- मऱ्हाटी पैठणी केंद्र पैठण येथील कारागीरांनी विणलेली साडी महाराष्ट्र कन्या मा. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना जळगाव महानगर पालिकेतर्फे भेट देण्यात आली व त्यांनी ती वाखाणली.
- भारताच्या वैभवशाली कलाकृतीचे प्रतीक असलेली पैठणी ही श्रीमती सोनिया गांधी यांनीही अत्यंत चोखंदळपणे वाखाणली.
- भारतीय बाजारपेठेत रेशमी दुनियेत उतरताना 'सिल्कमार्क' हे मानांकन प्राप्त करून आपले वेगळेपण रेशमी जगाच्या प्रवाहात मिसळलेले आहे.


मऱ्हाटी हस्तकला दालन, मुंबई



मऱ्हाटी हस्तकला दालन, नवी दिल्ली



मऱ्हाटी हस्तकला दालन, औरंगाबाद

## पैठणी डिझाइन विकास प्रशिक्षण योजना :

यो योजनेअंतर्गत विकास आयुक्त (हस्तकला), नवी दिल्ली यांच्या अर्थसहाय्याने नवीन नमुन्याचे कापड तसेच पैठणीचे निरनिराळे तयार कपडे बनविण्याचे प्रशिक्षण देण्याचे काम सध्या पैठण येथे सुरू आहे.

सदर योजनेअंतर्गत एखाद्या हस्तकलेमध्ये नवीन डिझाईन तयार करून तसेच त्यामध्ये नवीन तांत्रिक सुधारणा करून त्याद्वारे विविध वस्तू बनविण्याकरिता कारागिरांना प्रशिक्षण देणे, तयार झालेल्या नवीन डिझाईन्सच्या वस्तूंना प्रदर्शनांमध्ये सादर करून त्यासाठी मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन सदर डिझाईन्सनुसार उत्पादन करणे व या उत्पादित कलाकृतीची विक्री करणे याचा समावेश होतो. यासाठी विकास आयुक्त (हस्तकला), नवी दिल्ली यांच्यामार्फत प्रकल्प मूल्यानुसार अर्थसहाय्य देण्यात येते.





# पैठणी विणकाम प्रक्रिया





१ जोडणी करणे





२ रेशीम भरणे

३ कांडी तयार करणे

- पैठणी ही अस्सल रेशमी धाग्यापासून विणली जाते. या धाग्यांवर वखर काढण्याची व रंगणीची प्रक्रिया केली जाते. यामध्ये रेशमाच्या वजनामध्ये २५% घट होते. परंतु रेशीम अत्यंत मुलायम, टिकाऊ बनते.

## ४ हातमागावरील विणकाम



## ५ पदर विणणे





- या रेशमाची बांधणी हातमागावर दोन प्रकारे वापरली जाते.
  १. ताना (वगी) २. बाना (आडवान)
- ताना (वगी) ही हातमागाच्या मागील तुरईवर घट्ट गुंडाळली जाते. ही एकूण ४ हजार तारांची असते. याला बिम भरणे असेही म्हणतात.
  या ४ हजार तारा वही फणीमधून तिडी पद्धतीने ओवल्या जातात.
  याला पौनी म्हणतात.
- साडीसाठी किनारीचे रेशीम हे ताना बनवतानाच लावले जाते.
- बाना अथवा आडवान हे रेशीम लडीमध्ये येते. ते बांबू आसारीवर उकलले जाते व त्याच्या तारा करून चरख्यावर कांड्या भरल्या जातात.
  या कांड्या धोट्यामध्ये (शटल) मध्ये भरून विणकाम केले जाते.
- साडीचे व किनारीचे विणकाम हे शटलने एकत्र विणले जाते.
- पैठणीचे वैशिष्ट्य असे की पैठणीचा काठ व पदर लाल रंगाचा असून जरीचे आडवान वापरून विणले जातात व निरनिराळ्या रंगांनी काठावरील वेलबुट्टीचे नक्षीकाम केले जाते.








महाराष्ट्र लघुउद्योग विकास
महामंडळाच्या पैठण येथील पैठणी
केंद्रामध्ये अनेक कारागिरांना रोजगार
उपलब्ध झाला आहे



# “माझे-पैठणीचे रेशमी नाते...”

*पैठण येथील पैठणी प्रशिक्षण व उत्पादन केंद्रातील काही कारागिरांच्या प्रतिक्रिया व मनोगत*



मी बारा वर्षांचा होतो जेव्हा माझ्या आजोबांनी मला पैठणी विणकाम शिकवण्यास सुरुवात केली. मला, माझ्या वडिलांना आणि माझ्या भावांनाही त्यांनीच शिकवले. सुमारे १०० वर्षांपासून आमचे घराणे या कामात आहे.

माझ्या वडिलांकडे १९९० मध्ये बांगडी मोर पैठणीची मागणी आली होती. ती बारीक आणि गुंतागुंतीची नक्षी असलेली एक साडी विणायला त्यांना अडीच वर्षं लागली. साडी पूर्ण झाली त्यावेळी तिची किंमत ठरली दोन लाख रुपये! १९९३ ला त्या साडीसाठी आजोबांना राष्ट्रपतींकडून सन्मानित करण्यात आले. माझ्या मुलालाही पैठणी विणकाम कौशल्याप्रीत्यर्थ महाराष्ट्र शासनाचा २०१७ चा पुरस्कार मिळाला आहे.

सिल्क वर्षानुवर्षे, पिढ्यानपिढ्या टिकते आणि पैठणीची नक्षीही खराब होत नाही. पैठणीतले रंग दर सेंटीमीटरनंतर बदलता येतात. दहा हजाराच्या पैठणीमध्ये तीन साडेतीन हजाराची तरी चांदी असते. ही साडी दहा वर्षे वापरली तरी तोवर चांदीचीही किंमत वाढलेली असते. त्यामुळे पैठणी वापरात असूनही तिची किंमत कमी न होता वाढतच जाते.





पैठणी विणकामातील कौशल्यासाठी ढालकरी यांचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आजोबा




महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे हे पैठणी प्रशिक्षण केंद्र सन १९७६ मध्ये सुरू करण्यात आले. त्यावेळी येथे फक्त १० कारागीर होते. माझे वडील आणि आजोबा दोघेही लघुउद्योग महामंडळामध्ये काम करीत होते. १९८०–१९८२ च्या सुमारास आमची कौटुंबिक परिस्थिती खूपच हलाखीची होती. १९८२ मध्ये महामंडळाचे एमडी श्री. अजय दुआ यांनी पैठणीचे पहिले प्रदर्शन थेट दिल्ली येथे हॉटेल ताजमध्ये भरवले. त्या प्रदर्शनाला माझे वडील गेले होते. प्रदर्शनामध्ये दुआ साहेबांनी ५० साड्यांची आगाऊ मागणी नोंदवून घेतली. महामंडळाच्या केवळ १० कारागिरांकडून ५० साड्यांची भलीमोठी ऑर्डर कशी पूर्ण करता येणार? त्यानंतरही संपूर्ण भारतभर अशी प्रदर्शने भरवून दुआ साहेबांनी आणखी २०० साड्यांची नोंदणी करून घेतली. यानंतर केवळ १० कारागिरांवर अवलंबून न राहता त्यांनी पैठणी प्रशिक्षण केंद्राद्वारे अधिकाधिक कारागिरांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. प्रथम १० मग २५ असे करत करत कारागीर वाढत गेले. आज पैठणीचे सुमारे २००–२५० कारागीर पैठणमध्ये आहेत. पैठणच्या बाहेरचे लोकही येथे येऊन शिकून गेले. त्यामुळे तिथेही या कलेचा विकास झाला. अजय दुआ साहेबांमुळे पैठणी साडी तगली आणि तिचा प्रसार झाला. त्यांचे मनापासून आभार!

*– मदनलाल प्रभाकर ढालकरी*



*ही बांगडी मोर काठाची साडी विणण्यासाठी ढालकरी यांच्या आजोबांना अडीच वर्षे लागली. १९९२ मध्ये ही साडी दोन लाख रुपयांना विकली गेली. साडीच्या विणकामासाठी त्यांना राष्ट्रपतींकडून सन्मानित करण्यात आले.*






१९९७ पासून मी पैठणी साडी जोडण्याचे आणि साडी विणायचेही काम करतो. या कामाचा फायदा असा, की जे काम करण्यासाठी सामान्यपणे १५ ते २० दिवस लागतात ते केवळ सहा तासात पूर्ण करता येते. मी साड्या लवकर जोडून दिल्या की पुढचे काम कारागीर लगेचच सुरू करू शकतात. त्यामुळे त्यांचीही साडी कमी वेळात पूर्ण होते व त्यांना त्या मार्केटमध्ये लवकर आणता येतात. त्यात त्यांचाही अर्थातच पुष्कळ फायदा होतो. माझ्या कुटुंबातील सर्वच लोक हे साडी जोडण्याचे व विणण्याचे काम करतात.

***– अरुण भोसले***







पैठणी सेंटरमध्ये मी २००३ ते २००४ या दरम्यान ट्रेनिंग घेऊन त्यानंतर येथेच काम करायला सुरुवात केली. त्यावेळी माझी परिस्थिती खूप बिकट होती. लग्न खूप लवकर झाले. सासर आणि माहेर दोन्हीकडे गरिबी. शिक्षण कमी असल्यामुळे नोकरी मिळत नव्हती. मोलमजुरी करणाऱ्या सासू-सासऱ्यांवर तरी किती काळ आपल्या संसाराचे ओझे टाकायचे? नवराही स्वतःच्या पायावर उभे राहू देईना. सर्व रस्ते बंद झाल्यासारखे वाटत होते. शेवटी पैठणी केंद्राविषयी कळले. तसे घरी सांगितले तर सर्वांनी खूप कडाडून विरोध केला. कित्येक दिवस घरातले कोणीही माझ्याशी बोलत नव्हते. नवरा दारूचा व्यसनी. त्याची मारहाण सोसून केंद्रात जात होते तर त्याने कितीतरी वेळा केंद्रात येऊन भांडण करून मला घरी परत नेले. त्यातूनही जिद्दीने मी हे काम शिकले.
माझ्या पहिल्या मुनिया काठाच्या साडीची मजुरी २८६५ मिळाली. माझ्या आयुष्यात एवढी मोठी रक्कम मी प्रथमच पाहत होते. त्यानंतर मात्र माझ्या घरातल्यांना आनंद झाला.
सुरुवातीला मी बऱ्याच साड्या विणल्या, पैठणीचे सगळे प्रकार विणले, शेरवानी व ड्रेस मटेरिअल, ओढणी, रुमाल, जॅकेट, मोठमोठ्या डिझाइन्स विणल्या. माझे यू-ट्यूबवर अपलोड केलेले व्हिडिओ पाहून लोकांना आता माझे कौतुक वाटते. या कामामुळे मी माझ्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण करू शकले. त्या व्यतिरिक्त कलाकार म्हणून मला बँकेने सीसी लोन दिले. २००७ मध्ये बेस्ट वीवर अवॉर्ड मिळाले. दिल्ली, मुंबईसारख्या ठिकाणी मी प्रदर्शनालाही गेले आहे.
या पैठणीने मला मान-सन्मान, आर्थिक स्वातंत्र्य, मुलांसाठी चांगले शिक्षण असे सर्व काही दिले. या पैठणीवरच माझे सगळे जग किंवा माझे सगळे आयुष्य मी सेट केले, असे म्हणायला काहीच हरकत नाही.

– कविता अरुण ढवळे









सन २००२ मध्ये पैठणी केंद्रात प्रशिक्षणासाठी आले तेव्हा मी गरोदर होते. बाळंत झाल्यावर सव्वा महिन्यात पुन्हा ट्रेनिंगला आले व ते संपल्यावर इथेच काम करू लागले. पैठणी विणकामाची मला खूप हौस होती. त्यामुळे हे काम मला जमते व आवडते. इथे येणारेही कौतुक करतात. 'तुम्ही असे कलाकार आहात. तुम्ही अशी छान साडी करता...,'
असं म्हणतात.
मला एक मुलगी आणि दोन मुले आहेत. मुलं सहावी आणि दुसरीत आहेत तर मुलगी दहावीत आहे. मी हे काम शेवटपर्यंत करत राहीन, असं मला वाटतं. लोटस, कोयरी, मोर, मुनिया अशी बरीच डिझाइन्स मी करू शकते. लहानपेक्षा मोठ्या डिझाइन्सच्या साड्या मी जास्त केल्या. माझ्या कामात फिनिशिंग चांगले असल्यामुळे साहेब माझ्या मागे आणि समोरही माझे कौतुक करतात त्यांनी सध्या मला हा नवीन चेक्सवाला पॅटर्न दिला आहे! या साडीचे काम सुरू करून मला आता चार महिने झाले आहेत.

**– मंगल शिवाजी पवार**








मी मूळची पुण्याची. ८–९ वर्षांपूर्वी लग्न झाल्यावर मी पैठणला आले. पैठणीबाबत उत्सुकता होतीच. मी राहते त्या भागातही पुष्कळ महिला पैठणीचे विणकाम करतात. त्या या पैठणी केंद्रातूनच शिकून गेल्या आहेत. त्यांनी स्वतः च्या घरी हातमाग टाकले आहेत. त्या खूप सुंदर पैठणी बनवतात. ते पाहून मलाही हुरूप आला. तीन महिन्यांपूर्वी मी ट्रेनिंग सुरू केले. सुरुवातीला थोडंसं अवघड वाटलं पण नंतर जमू लागलं. या कामामुळे स्वत:चं काहीतरी अस्तित्व निर्माण करावं आणि हे काम चांगलं करून दाखवावं असं मला मनापासून वाटतं.

**– प्रिया श्रीराम भोळे**





पैठणी विणकामाचे प्रशिक्षण मी सन १९८५ मध्ये प्रशिक्षण केंद्रात घेतले. तेव्हापासून हे काम मी करत आहे. पैठणी विणकाम घरीच करत असल्यामुळे घरात लक्ष दिलं गेलं, मुलाचं शिक्षणही व्यवस्थित झालं. मी मोठमोठ्या ब्रॉकेड्स बनवते. त्या धागऱ्याच्या किनारीला जोडून विणण्याचे काम सध्या सुरू आहे. याचे कमीतकमी ७० ते ८० हजार तरी मिळतील अशी मला अपेक्षा आहे.

**– मथुरा रमेश लंगोटे**



पाच वर्षांपूर्वी मी नांदेडवरून येथे आले. कामाच्या शोधात असताना मला पैठणी प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश मिळाला. इथे होणारे काम मला आवडले. घरचेही मला यासाठी पूर्ण सहकार्य करतात. मला इथे सुरक्षित वाटतं. माझ्या कामामुळे घरी आर्थिक हातभार लागतो. आजकाल खूप लोक पैठणी प्रशिक्षण घेताना दिसतात इतकं हे काम छान आहे.

**– स्वाती राहुल वेलंकीवार**






महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळमध्ये मी २०१५–१६ मध्ये पैठणी विणकामाचं प्रशिक्षण घेतलं. यामध्ये ब्रॉकेड, आसावरी पैठणी, साखळी मोर ही डिझाइन्स मी विणतो. एका पैठणीची मजुरी सुमारे २५,००० च्या आसपास आहे. त्यात २०% तरी फायदा असतो. कमळवेलची मजुरी तर ६० ते ६५ हजाराच्या आसपास असते. त्यातही २०% ते २५% मार्जिन मिळते. प्रशिक्षण केंद्रातले राक्षे सर, जोगदंड सर, मांजरेकर सर यांचे आम्हाला पुष्कळ सहकार्य असते. महामंडळ अनेकांना घरी काम देते. आमची उपजीविका त्याच्यावरच चालते.

**– जितेंद्र सुरेश कुलकर्णी**









मला एकूणच विणकलेबाबत आवड आहे. सन ८४–८५ च्या दरम्यान मी एमएसएसआयडीसीमध्ये पैठणी विणकामाचे प्रशिक्षण घेतले. शिकता शिकता मला काम आल्यानंतर स्वत:चं काम सुरू केलं. लोटस, मोर, पोपट हे सर्व करू लागले.

मला दोन मुले आणि दोन मुली आहेत. मुलानेही पैठणी प्रशिक्षण घेतलं. पैठणी घ्यायला गिऱ्हाइक आमच्या घरीच येतात. प्रत्येक पैठणी दहा हजाराची तरी खपतेच.

**– सुनिता कुलकर्णी**



मी मूळची जालन्याची. शिक्षण सातवीपर्यंतच झाल्याने घरची परिस्थिती नाजूक असूनही हातभार लावता येईना. मिस्टरांचे टेलरिंगचे काम करून पाहिले पण जमले नाही. मग २००२ मध्ये पैठणी सेंटरमध्ये प्रशिक्षण घेतले. तेव्हापासून मी इथेच काम करते. माझ्या मुलांचे शिक्षण, प्रपंच वगैरे सगळे इथल्या कामामुळे नीट पार पडले. घरून मिस्टरांचा खूप आधार आहे. मला खूप समजून घेतात. मला दोन मुले आणि एक मुलगी आहे. मोठा मुलगा आयटीआय झाला आणि त्याला कामही मिळाले. दुसरा मुलगा सेकंड इअरला आहे. तो तबला विशारद आहे. पुढे त्याची इच्छा आहे की आपण पीएचडी करावी, आणखी अलंकार शिकावे. त्याची इच्छा मला पूर्ण करायची आहे. मुलगी आता नववीत आहे. तीही खूप हुशार आहे. तिची इच्छा आहे तोपर्यंत मी तिला शिकवेनच. तिनेही आयुष्यात काहीतरी करावे असे मला वाटते.

**– अनिता संतोष धोकटे**



माझं शिक्षण बारावीपर्यंत झालं. सासरी आर्थिक परिस्थिती नाजूक होती. घराला हातभार लागावा म्हणून काहीतरी काम करण्याची इच्छा होती. मला विणकामाची आवड होती. त्यामुळे २००० च्या दरम्यान मी येथे पैठणी विणकामाचे प्रशिक्षण घेतले. घरच्यांनी मला खूप विरोध केला. प्रशिक्षण झाल्यावर मी कामाला सुरुवात केली. मला या कामाची खूपच आवड आहे. चांगले काम केल्याबद्दल या पैठणीसाठी खूप वेळा मला बक्षिसही मिळालेले आहे. मुलांचे शिक्षण झाले. मुलीचे लग्न झाले. माझा मुलगा शिक्षक आहे. आणि दुसरा मुलगा शिकतो आहे. पैठणीमुळे माझी खूपच भरभराट झाली आहे.

**– काशिबाई अरुण पोटे**

२००७ पासून मी पैठणी विकामाचे प्रशिक्षण घेतले. सुरुवातीला मला वाटत नव्हतं की शिकेन म्हणून. कारण माझं शिक्षणही एवढं झालेलं नाही. जुनं २री – ३री शिक्षण आहे. मुलगी चौथीत गेली आणि मुलगा ८वीत होता त्यावेळेस मी प्रशिक्षणाला सुरुवात केली. दोघांच्या आधारावर मुलांचे शिक्षण होईल त्यामुळे बाहेर पाऊल टाकलं. प्रशिक्षणानंतर सरांनी जॉब दिला. या कामामुळे घरातल्या सर्वांना आनंद वाटू लागला. पैठणी ही खूप मोठी कला आहे. या कामामुळे आम्हाला सर्वांनाच खूप आनंद मिळतो.

**– सुमित्रा भारत बडसर**



मी ८४–८५ पासून हे काम करते. या कामापासून मला आनंद मिळतो. मुलांचे शिक्षण, घरदार याच कामामुळे होऊ शकले. पैठणचीच पैठणी प्रसिद्ध असल्यामुळे घरचे खूप आनंदाने इथे पाठवायचे. पैठणीचे सर्व जुने कारागीर ओळखीचे होते. पैठणी सेंटरही घरापासून जवळ होते. आता सूनबाईही इथे ट्रेनिंगला येऊ लागली आहे. ती माझ्यापेक्षाही छान करते. आतापर्यंत मी लोटस, पोपट अशा मोठ्या मोठ्या साड्या केल्या. इथल्या लोकांनी आम्हाला एकदम घरासारखं जपलं. त्यामुळे हे माहेरच वाटतं!

**– लक्ष्मीबाई प्रभाकर वाहोळे**



२००० मध्ये माझे प्रशिक्षण पूर्ण झाले आणि २००१ मध्ये लगेचच मला इथेच काम मिळाले. पगार मिळायला लागला. त्यावर घर चालू लागले. परिस्थिती सुधारली. इथे आणि घरीही मी पैठणीचे विणकाम करते. घरचे सगळे या कामामुळे माझे कौतुक करतात. राक्षे साहेबांनी आम्हाला शिकवले. आमच्याकडून करून घेतले. त्यांच्यामुळेच स्वतःच्या पायावर उभे राहता आले. लेकरांचे शिक्षण करू शकलो. त्यांची मी फार आभारी आहे. माझ्यासारख्या इथल्या सर्व महिला त्यांच्यामुळे आज कमवायला लागल्या. त्यांचे संसार आणि मुलांचे शिक्षण करू शकल्या.

**– अनिता शेळके**



# पैठणी

फडताळात एक गाठोडे आहे
त्याच्या तळाशी अगदी खाली
जिथे आहेत जुने कपडे,
कुंच्या, टोपडी, शेले, शाली.

त्यातच आहे घडी करून
जपून ठेवलेली एक पैठणी
नारळी पदर, जरी चौकडी,
रंग तिचा सुंदर धानी.

माझी आजी लग्नामध्ये
हीच पैठणी नेसली होती
पडली होती साऱ्यांच्या पाया
हाच पदर धरून हाती.

पैठणीच्या अंवतीभंवती
दरवळणारा सूक्ष्म वास
ओळखीची.. अनोळखीची..
जाणीव गूढ आहे त्यास.

धूर कापूर उदबत्त्यांतून
जळत गेले किती श्रावण
पैठणीने जपले
एक तन.. एक मन..

खसहिन्यांत माखली बोटे
पैठणीला केव्हा पुसली
शेवंतीची, चमेलीची
आरास पदराआडून हसली.

वर्षामागून वर्षे गेली,
संसाराचा सराव झाला
नवा कोरा कडक पोत
एक मऊपणा ल्याला.

पैठणीच्या घडीघडीतून
अवघे आयुष्य उलगडत गेले
अहेवपणी मरण आले,
आजीचे माझ्या सोने झाले.

कधीतरी ही पैठणी
मी धरते ऊरी कवळून
मऊ रेशमी स्पर्शामध्ये
आजी भेटते मला जवळून.

मधली वर्षे गळून पडतात;
कालपटाचा जुळतो धागा
पैठणीच्या चौकड्यांनो,
आजीला माझे कुशल सांगा.

**– शांता शेळके**



मऱ्हाटी

**Maharashtra Small Scale Industries Development Corporation**

**Krupanidhi, 9, Walchand Hirachand Marg, Ballard Estate, Fort, Mumbai, Maharashtra 400001**
**Phone: 022 2261 4939**

**Marhati Handicraft Gallery**
30, World Trade Centre,
Cuff Parade,
Colaba, Mumbai 400 005

**Marhati Handicraft Gallery**
8/A, State Emporia Bldg,
Baba Khadaksingh Marg,
New Delhi 110 001

**Marhati Paithani Manufacturing and Handicraft Gallery**
7 Bangalow, Sant Dyaneshwar
Udyan Road, Paithan,
Aurangabad 431 107

Created by Media R&D (I) Cell: 98199-07982